(1)


# सहसंचालक तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,

## नागपूर विभाग शासकीय तंत्रनिकेतन परिसर,सदर,नागपूर

दुरध्वनी क्रमांक : २५६५१४३ फॅक्स क्रमांक : ०७१२-२५६१६६३

E-mail:ronagpur.dte@gmail.com Website:www.rdtenagpur.org.in


## गट-क व गट-ड संवर्गातील रिक्त पदे भरण्यासाठी व प्रतिक्षा यादीसाठी जाहिरात

सहसंचालक, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, नागपूर यांचे कार्यालय व अधिनस्त विविध शासकीय संस्थांतील व कार्यालयातील खालिल तपशिलाप्रमाणे रिक्त पदे सरळसेवेने भरण्यासाठी पात्र उमेदवारांकडून शासनाने दिलेल्या निर्देशानुसार स्पर्धा परीक्षेसाठी (लेखी परीक्षा) महाराष्ट्र ज्ञान महामंडळ, पुणे (Maharashtra Knowledge Corporation Ltd. (MKCL, Pune) यांच्या मार्फत ऑनलाईन पध्दतीने अर्ज मागविण्यात येत आहेत.

| अ. क्र. | पदाचे नांव व वेतनश्रेणी | रिक्त पदांची संख्या | सामाजिक व समांतर आरक्षण पदे |
|---|---|---|---|
| | **संवर्ग : गट-क** | | |
| १. | **लघुलेखक (निम्नश्रेणी)**<br>वेतनबँड रु.९३००-३४८००/- ग्रेड पे रु.४३००/- | ०१ | खुला ०१ |
| २. | **कनिष्ठ लिपीक**<br>वेतनबँड रु.५२००-२०२००/- ग्रेड पे रु १९००/- | ०३ | इ.मा.व. ०१<br>खुला ०२ (महिला १) (सर्वसाधारण १) |
| ३. | **भांडारपाल**<br>वेतनबँड रु.५२००-२०२००/- ग्रेड पे रु.२८००/- | ०२ | अ.जा. ०१<br>अ.ज. ०१ |
| ४. | **सुतार**<br>वेतनबँड रु.५२००-२०२००/- ग्रेड पे रु.२४००/- | ०१ | खुला ०१ |
| ५. | **विजतंत्री**<br>वेतनबँड रु.५२००-२०२००/- ग्रेड पे रु.२४००/- | ०१ | खुला ०१ |
| ६. | **तांत्रिक प्रयोगशाळा सहाय्यक**<br>वेतनबँड रु.५२००-२०२००/- ग्रेड पे रु.२४००/- | ०२ | खुला ०२ |
| ७. | **प्रयोगशाळा सहाय्यक**<br>वेतनबँड रु.५२००-२०२००/- ग्रेड पे रु.२०००/- | ०३ | अ.जा. ०१<br>इमाव ०१ (माजी सैनिक)<br>खुला ०१ (भुकंपग्रस्त १) |
| | **संवर्ग : गट-ड** | | |
| ८. | **प्रयोगशाळा परिचर**<br>वेतनबँड रु.४४४०-७४४०/- ग्रेड पे रु.१३००/- | ०५ | इमाव ०३ (प्रकल्पग्रस्त १) (सर्वसाधारण २)<br>खुला ०२ |
| ९. | **शिपाई/हमाल**<br>वेतनबँड रु.४४४०-७४४०/- ग्रेड पे रु.१३००/- | ०७ | अ.जा. ०१ (खेळाडू)<br>विजा.अ. ०१<br>इ.मा.व. ०२ (महिला १) (सर्वसाधारण १)<br>खुला ०३ (भुकंपग्रस्त १) (माजी सैनिक १) (सर्वसाधारण१) |

**टिप : सदरच्या जाहिरातीमध्ये दर्शविण्यात आलेल्या रिक्त पदांच्या संख्येत कमी/जास्त बदल होण्याची शक्यता आहे. काही अपरिहार्य कारणाने परिक्षा स्थगित झाल्यास त्याबाबत अर्जदाराला कोणताही दावा सांगता येणार नाही. परिक्षेचा प्रकार, पदांची संख्या, समांतर आरक्षण, सामाजिक आरक्षण याबाबत बदल करणे, परिक्षा स्थगीत करणे व रद्द करणे, अशंतः बदल करणे, तसेच सेवाभरती प्रक्रियेत बदल करणे याबाबतचे सर्व अधिकार सहसंचालक, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, नागपूर हे स्वत:कडे राखून ठेवत आहेत. भरती प्रक्रिये संदर्भात उद्भवणारे वाद, तक्रारी इ.बाबत सहसंचालक, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, नागपूर यांचा निर्णय अंतिम राहील.**

②

## उपनिर्दिष्ठ सर्व पदांसाठी शैक्षणिक अर्हता, अनुभव आणि अन्य अटी खालीलप्रमाणे असतील.

| अ.क्र. | पदनाम | किमान शैक्षनिक अर्हता व अनुभव | परीक्षेचे स्वरुप |
|---|---|---|---|
| **संवर्ग : गट-क** | | | |
| १. | **लघुलेखक (निम्नश्रेणी)**<br>वेतनबँड रु.९३००-३४८००/-<br>ग्रेड पे रु.४३००/- | मान्यताप्राप्त शैक्षणिक संस्थेतून माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षा SSC) उत्तीर्ण व मराठी व इंग्रजी लघुलेखनाचा वेग किमान १०० शब्द प्रति मिनिट आणि इंग्रजी टंकलेखन वेग किमान ४० श.प्र.मि. व मराठी टंकलेखन वेग किमान ३० श.प्र.मि. परीक्षा उत्तीर्ण केल्याचे महाराष्ट्र स्टेट कौन्सिल एक्झामिनेशन्स यांचेकडील शासकीय वाणिज्य प्रमाणपत्र आवश्यक | लेखी परीक्षा, कौशल्य चाचणी व मुलाखत |
| २. | **कनिष्ठ लिपीक**<br>वेतनबँड रु.५२००-२०२००/-<br>ग्रेड पे रु १९००/- | मान्यताप्राप्त शैक्षणिक संस्थेतून माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षा (SSC) उत्तीर्ण व इंग्रजी टंकलेखन वेग किमान ४० श.प्र.मि. व मराठी टंकलेखन वेग किमान ३० श.प्र.मि. परीक्षा उत्तीर्ण केल्याचे महाराष्ट्र स्टेट कौन्सिल एक्झामिनेशन्स यांचेकडील शासकीय वाणिज्य प्रमाणपत्र आवश्यक | लेखी परीक्षा |
| ३. | **भांडारपाल**<br>वेतनबँड रु.५२००-२०२००/-<br>ग्रेड पे रु.२८००/- | मान्यताप्राप्त शैक्षणिक संस्थेतून माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षा (SSC) उत्तीर्ण व इंग्रजी टंकलेखन वेग किमान ४० श.प्र.मि. व मराठी टंकलेखन वेग किमान ३० श.प्र.मि. परीक्षा उत्तीर्ण केल्याचे महाराष्ट्र स्टेट कौन्सिल एक्झामिनेशन्स यांचेकडील शासकीय वाणिज्य प्रमाणपत्र आवश्यक आणि शासकीय किंवा शासनमान्य आस्थापना अंतर्गत भांडारपाल या पदावरील कामाचा किमान दोन वर्षाचा अभियांत्रिकी भांडार हाताळण्याचा अनुभव असणे आवश्यक. | लेखी परीक्षा |
| ४. | **सुतार**<br>वेतनबँड रु.५२००-२०२००/-<br>ग्रेड पे रु.२४००/- | शासनमान्य आय.टी.आय. सुतार अभ्यासक्रम उत्तीर्ण किंवा एन.सी.टी.व्ही.टी. सुतार प्रमाणपत्र उत्तीर्ण आवश्यक.<br>संबंधित क्षेत्रातील एक वर्षाचा अनुभव असल्यास प्राधान्य. | लेखी परीक्षा, कौशल्य चाचणी व मुलाखत |
| ५. | **विजतंत्री**<br>वेतनबँड रु.५२००-२०२००/-<br>ग्रेड पे रु.२४००/- | मान्यताप्राप्त शैक्षणिक संस्थेतून माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षा (SSC) उत्तीर्ण व शासनमान्य आय.टी.आय. विजतंत्री ट्रेड उत्तीर्ण किंवा सार्वजनिक बांधकाम अनुज्ञापक प्राधिकरण (Licensing Authority) यांनी निर्गमित केलेले प्रथमश्रेणी पर्यवेक्षक प्रमाणपत्र किंवा उच्च अर्हताधारक व वरील अर्हताधारण केल्यानंतरचा किमान एक वर्षाचा अनुभव असणे आवश्यक. | लेखी परीक्षा, कौशल्य चाचणी व मुलाखत |
| ६. | **तांत्रिक प्रयोगशाळा सहाय्यक**<br>वेतनबँड रु.५२००-२०२००/-<br>ग्रेड पे रु.२४००/- | महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळाचे / समकक्ष शासनमान्य स्वायत्य अभियांत्रिकी शाखेतील तीन वर्षिय पदविका (Engineering and Technology) उत्तीर्ण व संबधित क्षेत्रातील १ वर्षाचा प्रयोगशाळा सहाय्यक/मॅन्युफॅक्चरींग/सर्व्हिसिंग/मेन्टेनन्स/ डिझाईन क्षेत्रातील अनुभव व सी.एन.सी. मशीन हाताळण्याचा अनुभव आवश्यक<br>(अणुविद्युत / संगणक / माहिती तंत्रज्ञान / स्थापत्य / विद्युत / यंत्र शाखेतील पदविका असणाऱ्या उमेदवारास प्राधान्य) | लेखी परीक्षा व मुलाखत |
| ७. | **प्रयोगशाळा सहाय्यक**<br>वेतनबँड रु.५२००-२०२००/-<br>ग्रेड पे रु.२०००/- | मान्यताप्राप्त शैक्षणिक संस्थेतून माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षा (SSC) उत्तीर्ण.<br>२. प्रयोगशाळेतील कामाचा अनुभव असल्यास प्राधान्य. | लेखी परीक्षा व मुलाखत |
| ८. | **प्रयोगशाळा परिचर**<br>वेतनबँड रु.४४४०-७४४०/-<br>ग्रेड पे रु.१३००/- | शासन मान्य शिक्षण संस्थेतून इयत्ता सातवा वर्ग उत्तीर्ण असणे आवश्यक. तसेच प्रयोगशाळेत काम केल्याचा अनुभव असल्यास प्राधान्य. | लेखी परीक्षा व मुलाखत |
| ९. | **शिपाई/हमाल**<br>वेतनबँड रु.४४४०-७४४०/-<br>ग्रेड पे रु.१३००/- | शासन मान्य शिक्षण संस्थेतून इयत्ता चौथा वर्ग उत्तीर्ण असणे आवश्यक | लेखी परीक्षा व मुलाखत |

**कमाल व किमान वयोमर्यादा (दि.०४/१२/२०१३ रोजी)**

१. खुल्या प्रवर्गातील उमेदवारांसाठी किमान १८ व कमाल ३३ वर्ष
२. मागास प्रवर्गासाठी किमान १८ व कमाल ३८ वर्ष.
३. प्रकल्पक्रस्त / भूकंपग्रस्त / अपंग उमेदवारांसाठी ४५ वर्ष.
४. अच्युत्त गुणवत्ताधारक खेळाडू कमाल ३८ (सर्वसाधारण) व मागासवर्गीय खेळाडू कमाल ४३ वर्ष.
५. भूदल, हवाईदल किंवा नाविक दल सेवेमध्ये सहा महिने व त्यापेक्षा अधिक सेवा केली असेल तर संरक्षण सेवेमध्ये केलेली एकूण सेवा अधिक तीन वर्ष हा कालावधी माजी सैनिकांचे वय मोजताना कमी केला जाईल.
६. स्वातंत्र सैनिकांचे नामनिर्देशित पाल्य, जनगणना कर्मचारी व सन १९९४ नंतरचे निवडणूक कर्मचारी यांना ४५ वर्ष.
७. अंशकालीन पदवीधर अमेदवारांच्या बाबतीत कमाल वयोमर्यादा ४६ वर्ष.
८.

**सर्वसाधारण सूचना व अटी :**

०१. अर्जदार महाराष्ट्र राज्याचा अधिवासी असावा.

अ) उमेदवाराकडे अधिवास प्रमाणपत्र (Domicile Certificate) उपलब्ध नसल्यास त्यांनी त्यांचा जन्म महाराष्ट्र राज्यात झाला असल्याचा जन्म दाखला सादर करणे आवश्यक राहील.

ब) सदर उमेदवाराकाडे अधिवास प्रमाणपत्र तसेच जन्मतारखेचा दाखला उपलब्ध नसल्यास त्या उमेदवाराने आपला शाळा सोडल्याचा दाखला सादर करणे आवश्यक राहील. परंतु सदर शाळा सोडल्याच्या दाखल्यामध्ये त्या उमेदवाराचा जन्म महाराष्ट्र राज्यात झाला असल्याची नोंद असणे आवश्यक राहील.

क) उपरोक्त बाबी फक्त महाराष्ट्र राज्यात जन्म झालेल्या उमेदवारांसाठी लागू राहतील. इतर उमेदवारांसाठी अधिवास प्रमाणपत्र (Domicile Certificate) आवश्यक राहिल.

०२. उमेदवाराने अर्ज केला अथवा विहित अर्हता धारण केली म्हणजे परीक्षेला बोलविण्याचा अथवा नियुक्तीचा हक्क प्राप्त झाला असे नाही.

०३. प्राथमिक छाननी अंती ज्या उमेदवारांचा अर्ज नाकारण्यात आलेले नाहीत अश्या उमेदवारांना लेखी परीक्षेसाठी तात्पूरता प्रवेश दिला जाईल.

०४. मागासवर्गीय प्रवर्गातील आरक्षण हे महाराष्ट्र राज्याच्या अधिनिवासी उमेदवारापुरते मर्यादित राहील. आरक्षीत मागास प्रवर्गाचा दावा करणाऱ्या उमेदवारांना त्यासंदर्भातील सक्षम अधिकाऱ्यांनी दिलेले जात प्रमाणपत्र (Caste Certificate) व उपलब्ध असल्यास जात वैधता प्रमाणपत्राची (Caste Validity Certificate) साक्षांकित प्रत कागदपत्रे पडताळणीच्या वेळेस सादर करणे आवश्यक राहील.

०५. जात वैधता प्रमाणपत्र उपलब्ध नसल्यास महाराष्ट्र शासन प्रशासन विभाग शासन निर्णय क्रमांक बीसीसीः२०११/ प्र.क्र.१०६४/२०१११६ व दि.१२.१२.२०११ मधील तरतुदीनुसार याचिका क्रमांक २१३६/२०११ व अन्य याचिकांवर मा.मुंबई उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठाने दि.२५.०८.२०११ रोजी दिलेल्या आदेशाच्या विरोधात मा. सर्वोच्च न्यायालय, नवी दिल्ली येथे दाखल केलेल्या एसएलपी मधील आदेशाच्या अधीन राहून, तात्पूरती नियुक्ती आदेश निर्गमित केल्याच्या दिनांकापासून सहा महिन्यांच्या आंत जात वैधता प्रमाणपत्र सादर करणे अनिवार्य आहे, अन्यथा त्यांची नियुक्ती पूर्वलक्षीपणे रद्द करण्यांत येईल.

**०६. जाहीरातीतील सर्व पदांसाठी लेखी परीक्षा अनिवार्य आहे, उमेदवारांना मराठी भाषेचे ज्ञान असणे आवश्यक आहे.**

अ) लघुलेखक, सुतार व विजतंत्री या पदांकरीता लेखी परीक्षेला मराठी, इंग्रजी, सामान्य ज्ञान, अंकगणित व विभागाची माहिती या विषयांवरील प्रश्नांकरीता समान गुण ठेऊन १०० गुणांची वस्तुनिष्ठ बहुपर्यायी लेखी परीक्षा घेण्यात येईल, कौशल्य चाचणी ८० गुणांची घेण्यात येईल व २० गुणांची मुलाखत घेण्यात येईल.

ब) कनिष्ठ लिपीक व भांडारपाल या पदांकरीता लेखी परीक्षेला मराठी, इंग्रजी, सामान्य ज्ञान, अंकगणित व विभागाची माहिती या विषयांवरील प्रश्नांकरीता समान गुण ठेऊन २०० गुणांची वस्तुनिष्ठ बहुपर्यायी लेखी परीक्षा घेण्यात येईल व त्याआधारे गुणवत्तेनुसार निवड केली जाईल.

क) तांत्रिक प्रयोगशाळा सहाय्यक व प्रयोगशाळा सहाय्यक या पदांकरीता लेखी परीक्षेला मराठी, इंग्रजी, सामान्य ज्ञान, अंकगणित व विभागाची माहिती या विषयांवरील प्रश्नांकरीता समान गुण ठेऊन १८० गुणांची वस्तुनिष्ठ बहुपर्यायी लेखी परीक्षा घेण्यात येईल व २० गुणांची मुलाखत घेण्यात येईल.

ड) शिपाई/हमाल/प्रयोगशाळा परिचर या पदांकरीता मराठी, सामान्य ज्ञान, भौगोलिक ज्ञान इ. विषयावरील प्रश्नांकरीता समान गुण ठेऊन ८० गुणांची वस्तुनिष्ठ बहुपर्यायी लेखी परीक्षा व २० गुणांची मुलाखत घेण्यात येईल.

लघुलेखक, सुतार, विजतंत्री या पदांकरीता जे उमेदवार लेखी परीक्षेत ४५ टक्के व त्यापेक्षा जास्त गुण मिळवितील असेच उमेदवार कौशल्य चाचणी व मुलाखतीसाठी पात्र असतील. लेखी परीक्षा व कौशल्य चाचणी परीक्षेतील एकूण गुणांच्या गुणवत्तेनुसार व पदांच्या प्रमाणात मुलाखतीसाठी बोलाविण्यात येईल. लेखी परीक्षा, कौशल्य चाचणी व मुलाखतीचे गुण एकत्रित करुन अंतिम गुणवत्ता यादी तयार केली जाईल.

तांत्रिक प्रयोगशाळा सहाय्यक, प्रयोगशाळा सहाय्यक व शिपाई/हमाल/प्रयोगशाळा परिचर या पदांकरीता जे उमेदवार लेखी परीक्षेत ४५ टक्के व त्यापेक्षा जास्त गुण मिळवितील असेच उमेदवार मुलाखतीसाठी पात्र असतील. लेखी परीक्षेतील एकूण गुणांच्या गुणवत्तेनुसार व पदांच्या प्रमाणात मुलाखतीसाठी बोलाविण्यात येईल.

**उमेदवारांना लेखी परीक्षा / कौशल्य चाचणी / मुलाखत यासाठी स्वखर्चाने उपस्थित राहावे लागेल. मुलाखतीस गैरहजर राहील्यास उमेदवार अंतिम निवडीसाठी अपात्र ठरेल.**

०७. सर्व प्रवर्गातील उमेदवारांना लेखी परीक्षा, कौशल्य चाचणी तसेच मुलाखतीला बोलाविलेल्या ठिकाणी स्वखर्चाने उपस्थित रहावे लागेल. **परीक्षा नागपूर येथे घेण्यात येईल.**

०८. लेखी परीक्षेमध्ये फक्त काळया / निळया शाईच्या बॉलपेनचा वापर करणे बंधनकारक आहे.

(4)

०९. पद भरतीची प्रक्रिया अत्यंत तर्कशुध्द व पारदर्शक पध्दतीने गुणवत्तेच्या आधारे पार पाडली जाणार असल्याने कोणीही कोणत्याही प्रलोभनांना बळी पडू नये. एखाद्या अर्जदाराने त्यांच्या निवडीसाठी निवड समितीवर प्रत्यक्ष / अप्रत्यक्ष दबाव आणण्याचा प्रयत्न केल्यास त्यास निवड प्रक्रियेतून अपात्र ठरविले जाईल.

१०. निवड प्रक्रियेदरम्यान व तदनंतर उमेदवारांनी सादर केलेली प्रमाणपत्रे संशयास्पद वा अयोग्य / अपर्याप्त आढळल्यास उमेदवारांची निवड / नियुक्ती कोणत्याही टप्प्यावर रद्द केली जाईल.

११. उमेदवाराने एकूण गुणांच्या किमान ४५ टक्के गुण प्राप्त करणे आवश्यक राहील.

१२. महाराष्ट्र शासन सामान्य प्रशासन विभाग परिपत्रक क्रमांक : एसआरव्ही-१०९७/प्र.क्र.३१/९८/१६-अ, दि.१६.०३.१९९९ अन्वये समांतर आरक्षणातील प्रवर्गातील उमेदवार उपलब्ध झाले नाही तर सामाजिक आरक्षणातील त्या त्या प्रवर्गातील उमेदवाराची निवड करण्यांत येईल. समांतर आरक्षण हे सामाजिक आरक्षण अंतर्गत आरक्षण असल्याने त्यास सामाजिक आरक्षणावर वाढीव म्हणून गणण्यात येणार नाही. सामान्य प्रशासन विभाग यांच्याकडील पत्र क्र.पअंक -.१०१०/७१७/प्र.क्र.३२२/१०/१६अ, दि.२६ ऑगस्ट, २०१० पत्रान्वये एकदा नोकरी मिळाल्यानंतर पुन्हा दुसऱ्या पदावर नोकरी मिळण्यासाठी त्यास समांतर आरक्षणाचा लाभ देणे शासन धोरणाशी विसंगत आहे. एकदा उमेदवाराने समांतर आरक्षणाचा लाभ घेतला असल्यास त्या उमेदवारास पुन्हा समांतर आरक्षणाचा लाभ देता येणार नाही.

१३. महिला आरक्षणासाठी महिला उमेदवार न मिळाल्यास त्या प्रवर्गातील पुरुष उमेदवारांमधून पदे भरण्यात येतील. महिला आरक्षण हे शासन निर्णय महिला व बालकल्याण विभाग ८२/२००१ म.से.आ.-२०००/प्र.क्र.४१५/का-२, दि.२५/०५/२००१ मधिल तरतुदींनुसार राहील. खुल्या प्रवर्गातील महिलांना उन्नत व प्रगत व्यक्ती व गट यामध्ये मोडत नसल्याबाबतचे सक्षम अधिकारी यांचे दिनांक ३१/०३/२०१४ या दिनांकापर्यंत वैध असलेल्या नॉन क्रिमीलेअर प्रमाणपत्र इ. कागदपत्रे पडताळणीचे वेळेस सादर करणे आवश्यक आहे.

१४. खुल्या प्रवर्गातील महिला आरक्षित पदासाठी जर अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती या प्रवर्गातील महिला उमेदवारांनी अर्ज केल्यास त्यांना सक्षम प्राधिकाऱ्याने निर्गमित केलेले जात व जात वैधता प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक राहील. अन्यथा अशा महिला उमेदवारांनी खुल्या प्रवर्गातील महिलांप्रमाणेच उन्नत व प्रगत गटात मोडत नसल्याबाबतचे दिनांक ३१/०३/२०१४ पर्यंत वैध असलेले नॉन क्रिमिलेअर प्रमाणपत्र कागदपत्रे पडताळणीचे वेळी सादर करणे आवश्यक राहील.

१५. गट-क पदांकरीता अर्ज करणाऱ्या उमेदवारांनी संगणक हाताळणी / वापराबाबतचे पुढे नमूद केलेले प्रमाणपत्र नियुक्ती दिनांकापासून दोन वर्षाच्या आंत सादर करणे आवश्यक राहील. अन्यथा त्याची सेवा समाप्त होईल. D.O.E.A.C.C. सोसायटीच्या अधिकृत C.C.C. किंवा O स्तर किंवा A किंवा B स्तर किंवा C स्तर पैकी कोणतीही एक परीक्षा उत्तीर्ण झाल्याचे प्रमाणपत्र किंवा महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ, मुंबई यांच्याकडील अधिकृत MS-CIT परीक्षा उत्तीर्ण झाल्याचे प्रमाणपत्र.

१६. शैक्षणिक अर्हता, वय, अनुभव, अधिवास दाखला तसेच जातीचा दाखला उपलब्ध असल्यास जात वैधता प्रमाणपत्र अज/अजा उमेदवार / अर्जदार वगळून इतरांनी उन्नत व प्रगत गटात मोडत नसल्याबाबत इ. प्रमाणपत्रांच्या साक्षांकित व मूळ प्रतीत, कागदपत्रे तपासणीच्या वेळेस सादर करणे आवश्यक आहे.

१७. साक्षांकित प्रती केंद्र/राज्य शासनाचे राजपत्रित अधिकारी, पोष्ट मास्तर, मुख्याध्यापक व याबाबत प्राधिकृत व सक्षम अधिकाऱ्यांनीच केले असावे. तसे नसल्यास किंवा चुकीची माहिती असल्यास अर्ज अपूर्ण समजून नाकारला जाईल.

**१८. शासकीय / निमशासकीय सेवेतील संबंधित प्रवर्गातील कर्मचाऱ्यांनी ना-हरकत प्रमाणपत्र कागदपत्रे पडताळणीच्या वेळेस सादर करणे आवश्यक राहील.**

१९. जाहिरातीमधील पदासाठी अर्ज करणाऱ्या विवाहित उमेदवारांनी त्यांच्या अर्जासोबत शासन अधिसूचना एसआरव्ही-२०००/प्र.क्र.(१७/२०००)/बारा, दिनांक २८/०३/२००५ नुसार नमुना "अ" नियम ४ प्रमाणे लहान कुटूंबाचे प्रतिज्ञापत्र कागदपत्रे पडताळणीच्या वेळेस सादर करणे बंधनकारक राहील, सदरचे प्रतिज्ञापत्र प्राप्त न झाल्यास संबंधित उमेदवाराचा अर्ज रद्द करण्यात येईल, याची नोंद घेण्यात यावी.

२०. शासन निर्णय क्रमांक : अंनियो-१००५/१२६/सेवा-४, दिनांक ३१ ऑक्टोंबर २००५ मधील तरतुदींनुसार नियुक्तीसाठी निवड झालेल्या उमेदवारांना नवीन अंशदान निवृत्तीवेतन योजना लागू राहिल.

२१. वित्त विभाग परिपत्रक क्रमांक अनियो १००५/१२६/सेवा-४, दिनांक १२ जानेवारी २००७ व वित्त विभाग परिपत्रक अनियो १००९/१३/सेवा-४, दिनांक २४ फेब्रुवारी २००९ मधील सर्व अटींची पुर्तता होत असल्यासच **शासकीय कर्मचाऱ्यास** महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्ती वेतन) नियम १९८२ व सर्वसाधारण भविष्य निर्वाह निधी योजना लागु राहील.

२२. अजा, अज प्रवर्ग वगळून सर्व प्रवर्गातील उमेदवारांनी समाजाच्या उन्नत व प्रगत गटात मोडत नसल्याबाबतचे **(नॉन क्रिमिलेअर)** दिनांक ३१/०३/२०१४ पर्यंतचे वैध असलेले प्रमाणपत्र कागदपत्रे पडताळणीच्या वेळेस सादर करणे आवश्यक आहे, अन्यथा त्यांचा आरक्षित पदासाठी विचार केला जाणार नाही.

२३. रोजगार व स्वयंरोजगार विभाग अथवा अन्य अधिकृत विभागाकडे नोंदणी केली असल्यास अद्ययावत नोंद पत्राची छायांकित प्रत सादर करणे बंधनकारक राहील.

२४. जाहिरातीत नमूद केल्याप्रमाणे पात्रताधारक असल्याची खात्री करुनच उमेदवाराने अर्ज करावे.

२५. ज्या अपंग उमेदवारास लेखनिक नियमानुसार अनुज्ञेय आहे, अशा उमेदवाराने लेखनिकाची व्यवस्था स्वतः करावी व लेखनीक संबंधित पदाच्या किमान शैक्षणिक अर्हतेपेक्षा एक इयत्ता कमी शिकलेला असावा.

२६. अनुभवाच्या बाबतीत तासिका, नियतकालिक, अर्धवेळ, विद्यावेतन, अभ्यागत, विनावेतन तत्वावर केलेल्या अंशकालीन सेवेचा कालावधी तसेच प्रभारी म्हणून नेमणूकीचा कालावधी, अतिरिक्त कार्यभाराचा कालावधी अनुभवासाठी ग्राहय धरता येणार नाही, अंशकालीन कर्मचाऱ्यांनी त्यांच्या अनुभवाची सेवायोजन कार्यालयाकडे नोंदणी करणे आवश्यक आहे व तसे केल्याचे पुरावे कागदपत्रे पडताळणीच्या वेळेस सादर करणे बंधनकारक राहील.

२७. अंतरिम निवड यादी मधील पात्र उमेदवारांच्या प्रमाणपत्राच्या साक्षांकित प्रती मूळ प्रमाणपत्राच्या आधारे कागदपत्र तपासणीच्या वेळी तपासण्यात येतील. सदर प्रमाणपत्रांच्या मुळ प्रती (Original Copy) कागदपत्रे तपासणीच्यावेळी उपलब्ध करुन देणे उमेदवारावर बंधनकारक राहील. त्यामधील प्रमाणपत्रे उपलब्ध करुन न दिल्यास तसेच खोटी किंवा चुकीची आढळल्यास संबंधित उमेदवार अपात्र ठरविण्यात येईल. तसेच निवड प्रक्रिया सुरु झाल्यानंतर कोणत्याही क्षणी उमेदवाराने कागदपत्रे खोटी सादर केल्याचे किंवा खरी माहिती दडवून ठेवल्याचे निदर्शनांस आल्यास त्या उमेदवाराची उमेदवारी नियुक्ती प्रक्रियेच्या कोणत्याही टप्प्यावर रद्द करण्यात येईल / शासकीय सेवेत असल्यास बडतर्फ करण्यात येईल.

२८. निवड झालेल्या उमेदवारांना शासनाच्या प्रचलित नियमाप्रमाणे वेतन व भत्ते लागू राहतील.

२९. **अर्ज करण्याची पध्दत :**

- ऑन लाईन अर्ज http://oasis.mkcl.org/jdte2013 या वेबसाईट वर उपलब्ध राहील.
- पदासाठी उमेदवाराने ऑन लाईन अर्ज भरते वेळी सर्व कागदपत्रे आणि स्वतःचा अलिकडील काळातील पासपोर्ट साईज फोटो व सहीची (Scanned image) स्वतः जवळ असल्याची खात्री करावी. फॉर्म भरतेवेळी आपल्याला फोटो व सहीची Image upload करावी लागेल.
- उमेदवाराने ऑन लाईन अर्ज ज्या पदासाठी भरणार आहे, त्या पदाची पात्रता जाहिरातीमध्ये काळजीपूर्वक वाचावी व लहान कुटूंब असले बाबतचे प्रतिज्ञापत्राचा नमुना MKCL च्या संकेत स्थळावर उपलब्ध आहे.
- Online अर्ज भरण्यासाठी Apply Online हया लिंक वर क्लिक करुन अर्ज भरण्यास सुरुवात करावी.
- आपल्यास अर्ज करावयाचे पद निवडा. एक-एक करत आपल्यास विचारलेल्या प्रश्नांचे उत्तर (Yes/No) पैकी योग्य पर्याय निवडा, संगणक प्रणाली तुम्ही दिलेल्या उत्तराच्या आधारे तुमची प्राथमिक पात्रता तपासेल.
- ज्या प्राथमिक पात्रता चाचणीत आपण पात्र असाल तर, ज्या पदासाठी अर्ज भरायचा आहे, ते पद निवडा आणि आवश्यक माहिती भरा.
- आवश्यक माहिती भरल्यानंतर संगणक प्रणाली तुमचा लॉगीन आय.डी. आणि पासवर्ड निर्माण करुन तुम्हाला तुमच्या स्क्रीनवर लॉगीन आय.डी., पासवर्ड दाखवेल आणि तुम्ही पुरवलेल्या मोबाईल क्रमांकावर SMS करेल (कृपया आपण मोबाईल क्रमांक 'अचूक टाकावा जेणेकरुन आपल्याला लॉगीन आय.डी. आणि पासवर्डची माहिती आपल्या मोबाईल क्रमांकावर SMS व्दारे प्राप्त होईल.) हा लॉगीन आय.डी. म्हणजेच तुमचा अर्ज क्रमांक असेल.

३०. **प्रक्रिया व परीक्षा शुल्क** : सर्वसाधारण (खुल्या प्रवर्गातील) उमेदवारांसाठी रुपये ४००/- (रुपये चारशे फक्त) व मागासवर्गीय उमेदवारांसाठी रुपये ३००/- (रुपये तिनशे फक्त) परीक्षा शुल्क असून आवश्यक परीक्षा शुल्क रोखीने State Bank of India च्या कुठल्याही शाखेत भरावी.

उमेदवारास एका पदापेक्षा जास्त पदासाठी अर्ज करायचा असल्यास, प्रत्येक पदासाठी स्वतंत्र अर्ज करावा लागेल व त्यासाठी स्वतंत्र भरतीप्रक्रिया शुल्क भरावे लागेल. सदर **परीक्षा शुल्क हे ना-परतावा राहील.** माजी सैनिकांना अर्जासोबत भरतीप्रक्रिया शुल्क भरण्याची आवश्यकता नाही, मात्र त्यासाठी त्यांनी सैनिकी सेवेचा पदावधी पूर्ण केल्याबाबतच्या कार्यमुक्त पत्राची साक्षांकित छाया प्रत अर्जासोबत सादर करणे आवश्यक राहील.

३१. **शुल्क भरल्या नंतर कार्यालयीन कामकाजाच्या दुसऱ्या दिवशी उर्वरीत ऑन लाईन अर्ज "Fill Application Form / अर्ज भरा"** या लिंकवर क्लिक करुन अर्ज पूर्ण भरावा. शुल्क भरल्यानंतर अर्जदाराने अर्जामध्ये खालील माहिती भरुन अर्ज पूर्ण करणे आवश्यक आहे. त्याशिवाय आपला अर्ज पूर्ण होणार नाही.

- वैयक्तीक माहिती
- आरक्षण बद्दलची माहिती
- शैक्षणिक अर्हता
- फोटो आणि सही अपलोड

- कामाचा अनुभव
- इतर आवश्यक माहिती

वरील सर्व माहिती अर्जामध्ये भरावी ती भरल्या शिवाय आपला अर्ज पूर्ण होणार नाही, माहिती भरल्यानंतर अर्जाची प्रिंट काढून आपल्या माहितीसाठी जतन करुन ठेवावी.

**ऑनलाईन अर्ज पूर्ण भरल्यानंतर अर्जाची प्रत तंत्र शिक्षण विभागीय कार्यालय, नागपूर कार्यालयाला किंवा महाराष्ट्र ज्ञान महामंडळ, पुणे (Maharashtra Knowledge Corporation Ltd. (MKCL, Pune) ला पाठविण्याची आवश्यकता नाही.**

तुमची अर्ज प्रक्रिया पूर्ण होते, अर्जदाराने नियमितपणे वेबसाईट चेक करावी.

**लेखी परीक्षेचे ओळखपत्र परीक्षेपूर्वी तुमच्या लॉगिनमध्ये व वेबसाईटवर उपलब्ध राहील, हयासाठी वेगळा पत्रव्यवहार केला जाणार नाही याची कृपया नोंद घ्यावी.**

३२. पदासाठी असणारी किमान अर्हता आणि पात्रता धारण करणाऱ्या व लेखी परीक्षेस पात्र ठरणाऱ्या उमेदवारांना या पदासाठी घेण्यात येणाऱ्या परीक्षेची रुपरेषा, वेळापत्रक, परीक्षा केंद्र, बैठक क्रमांक इ. बाबतची माहिती http://oasis.mkcl.org/jdte2013 वर उपलब्ध राहील. या प्रक्रियेच्या अनुषंगाने कोणताही पत्रव्यवहार करण्यात येणार नाही.

३३. **जिल्हा रोजगार व स्वयं रोजगार, मार्गदर्शन केंद्र व आदिवासी विकास विभागाकडे नाव नोंदणी केली असली तरी वरिल पदासाठी स्वतंत्रपणे रितसर Online अर्ज करणे आवश्यक आहे.** नाव नोंदणी केलेल्या प्रमाणपत्राची साक्षांकित केलेली प्रत कागदपत्र पडताळणीच्या वेळेस सादर करणे आवश्यक आहे.

३४. उमेदवारांनी अर्जासोबत माहिती सादर करताना सतत कार्यान्वित असलेल्या भ्रमणध्वनी (Mobile) क्रमांक व ई मेल आयडी नमुद करावा. जेणेकरुन आपणांस संपर्क करुन आवश्यक ती माहिती देणे सुलभ होईल.

३५. ज्या उमेदवारांनी Online नोंदणी केलेली आहे आणि आवश्यक आवेदन शुल्क अदा केलेले आहे. त्यांना लेखी परीक्षेकरीता Online Call Letters Download करण्याची मुभा आहे. Online Call Letters पाठवितांना अर्जाची तपशीलवार छाननी करण्यात येणार नाही. Call Letters, http://oasis.mkcl.org/jdte2013 या संकेत स्थळावरुन Download करता येतील.

३६. परीक्षेकरीता येतांना उमेदवाराने पॅन कार्ड / आधार कार्ड / पासपोर्ट / मतदार कार्ड फोटो असलेले ओळखपत्र सोबत आणावे.

३७. एकाच स्थानासाठी (Position) दोन किंवा अधिक उमेदवारांना समान गुण मिळाल्यास खालील प्राध्यान्य क्रमाच्या आधारे उमेदवाराची अंतिम निवड करण्यात येईल.
अ) स्वातंत्र्य सैनिकांचे नामनिर्देशित व्यक्ती / माजी सैनिक, ब) संप कालिन कर्मचारी, क) १९९४ नंतरचे जनगणना कर्मचारी, ड) उच्च शैक्षणिक अर्हता व पदासाठीची विहीत शैक्षणिक अर्हता, परीक्षेत प्राप्त केलेले गुण, इ) अनुभव, फ) वयाने जेष्ठ.

३८. निवड झालेल्या उमेदवारांची नियुक्ती विभागात कोठेही करण्यात येईल व तो बदलीस पात्र राहील.

३९. अतिरिक्त संवर्ग, आंतरविभागीय समायोजन इ. व अन्य कारणांमुळे पदसंख्या व (पदसंख्या कमी/जास्त होणे) आरक्षणामध्ये बदल होवू शकते. सदरची पदे मा.आयुक्त, नागपूर विभाग, नागपूर यांचेकडील अतिरिक्त कक्षाकडून उमेदवार प्राप्त होण्याचे ना-हरकत प्रमाणपत्राच्या अधिन राहून देण्यात येत आहे. अतिरिक्त कक्ष नागपूर यांच्याकडून मागणी नुसार उमेदवार उपलब्ध झाल्यास उक्त पदांमध्ये बदल होवू शकतो, याबाबत कोणतीही तक्रार ग्राहय धरल्या जाणार नाही.

४०. ऑनलाईन अर्ज भरताना उमेदवाराने आपली संपूर्ण शैक्षणिक माहिती भरावी. जसे की, (४ थी/ ७ वी/ १० वी/ १२ वी/ डिप्लोमा/ ग्रॅज्युएशन)

**महत्वाच्या तारखा :**

| अनुक्रमांक | कार्यक्रम | दिनांक | |
|---|---|---|---|
| | | पासून | पर्यंत |
| १. | अर्ज ऑनलाईन नोंदणी (रजिस्ट्रेशन) करण्याचा कालावधी | दि. ०४/१२/२०१३ | दि. १७/१२/२०१३ |
| २. | संगणकीय चलनाव्दारे स्टेट बँक ऑफ इंडिया (SBI) यांच्या शाखांमध्ये फी स्वीकृतीचा कालावधी | दि. ०४/१२/२०१३ | दि.१९/१२/२०१३ |
| ३. | ज्या उमेदवारांनी बँकेमध्ये दिनांक १९/१२/२०१३ पर्यंत भरती प्रक्रिया शुल्क जमा केले असेल त्यांचासाठी उरलेला ऑनलाईन अर्ज भरण्याचा कालावधी | दिनांक २१/१२/२०१३ रात्री २३.५९ वाजेपर्यंत | |

**टिप्पणी :** अर्ज भरण्यापूर्वी अर्जदाराने जाहिरातीत नमुद केलेल्या सर्व आवश्यक अर्हता आपण पूर्ण करत आहोत का? याची खात्री करुन घ्यावी. कार्यालय,उमेदवार मुलाखतीकरीता पात्र असल्यानंतरच मूळ दस्तऐवजा संदर्भातील अर्हतेच्या अटींची पडताळणी करेल. या जाहिरातीत नमूद करण्यांत आलेल्या विहित आवश्यक अर्हतेच्या पूर्तीच्या अधीन राहून उमेदवाराचा भरती प्रक्रियेमधील प्रवेश पूर्णतः तात्पुरता असेल.

सही/-

**सहसंचालक,**
**तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, नागपूर**